**प्रेसनोट दि.२१/०५/२०१९**
**चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन पुणे**
**चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन सार्वजनिक रोड वरील चारचाकी वाहनांचे काचा फोडून गुन्हे करणा-या सराईत चोरटयास अटक करून ०८ गुन्हे उघडकीस आणून उत्तम कामगिरी केली आहे.**

---

चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये दिनांक १४/०५/२०१९ रोजी पेट्रोलिंग करीत असताना पोलीस शिपाई ज्ञानेश्वर मुळे व तेजस चोपडे यांना बातमी मिळाली की,रेकॉर्ड वरील चारचाकी वाहनांच्या काचा फोडून गुन्हे करणारा सराईत इसम नामे अरूण बाबुराव देशमुख रा.सोलापूर याने एक महिन्यापुर्वी ऑकेजन लॉन्स बाणेर पुणे येथे एका वॅगनर कारची काच फोडून चोरी केली आहे व सध्या तो मिडीपॉईट हॉस्पीटल जवळ औंध पुणे येथे पांढरी अल्टो कार क्र.एम.एच.१४.डी.ए.८८४७ या गाडीमध्ये बसला आहे अशी खात्रीशीर माहिती मिळालेनंतर सदर महिती मा.पोलीस उप आयुक्त,श्री प्रसाद अक्कानवरू,परिमंडळ ४ पुणे शहर,मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री देविदास पाटील,खडकी विभाग पुणे शहर यांना देवून त्यांनी केलेल्या सुचना प्रमाणे भास्कर जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती वैशाली गलांडे पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्री संदेश केंजळे,पोलीस उप निरीक्षक तुकाराम फड, कर्मचारी पो.हवा. बाळासाहेब गायकवाड,पो.हवा.एकनाथ जोशी,पोलीस हवा.प्रदिप खळदकर, मुकुंद तारू,आबा गुंड,पो.ना.सारस साळवी,पोना प्रकाश आव्हाड,पोना दादासो काळे, संतोष जाधव,अजय गायकवाड व पो.शि.तेजस चोपडे, ज्ञानेश्वर मुळे,अमर शेख यांचे टिम ने इसम नामे अरूण बाबुराव देशमुख,वय ५८ वर्षे रा.प्लॉट नं.१३/अ,कल्याणनगर ३,होटकी रोड,आसरा चौक,जुळे सोलापूर यास मिडी पॉईंट हॉस्पीटल जवळून ताब्यात घेवून त्याचेकडे तपास करता त्याचेकडून चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन कडील ०८ गुन्हे उघडकीस आले असून सदर गुन्हयामध्ये एकूण २,८९,०००/-कि. रू चे सोन्याचे दागिने ५६ ग्रॅम वजनाचे,एक अल्टो कार नं. क्र.एम.एच.१४.डी.ए.८८४७,एक लगोर,दोन स्टीलच्या पट्टया एक लोखंडी हुक असा मला हस्तगत करण्यात आला आहे. अधिक तपास सहा.पोलीस निरीक्षक,संदेश केंजळे हे करीत आहेत.

**(भास्कर जाधव )**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**चतु:श्रृंगी पो.स्टे.पुणे शहर**